॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
**श्री शारदा रोपवाटिका**
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**विकास वॉटरप्रूफिंग**
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्षे
विकास वॉटरप्रूफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १९६ वा | मंगळवार, दि. १० मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



**सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!**
**श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे**
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
**1299/- प्रति स्क्वे. फूट**
**मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर** मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

**कृषी विषयक**
मिरची, सिमला मिरची, पपई, वांगी, कलिंगड, खरबूज, काकडी पिकांवरील थ्रिप्स, पांढरी माशी, कोळी, व्हायरस, चुरडा-मुरडा नियंत्रणासाठी, जलद वाढ, फुटव्यासाठी, पिकांची रोगप्रतिकारक, किड प्रतिबंधक शक्ती, उष्णतेचा ताण सहन करण्याची क्षमता वाढवण्यासाठी एकमात्र अनुभवसिध्द औषधी 'प्रतिकार', 'प्रहार', 'प्रतिबंध' महाराष्ट्रात कोठेही पाठवले जाईल.
संपर्क :
कुदरत ॲग्रो ऑरगॅनिक्स
9970115450


# जगावर मोठ्ठं तेलसंकट ? आशियायी देशांचे टेन्शन वाढले, उद्योग जगतात चिंता

## इराण-इस्त्रायल युद्धाचा भारताच्या शेतकऱ्यांना फटका; खतांच्या किमती भडकणार?

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** इराण, इस्रायल, अमेरिका यांच्यात वाढत चाललेल्या संघर्षाचे परिणाम आता दिसू लागले आहेत. 'होर्मुझ' सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक इराणकडून देण्यात आलेल्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर ठप्प आहे. अनेक बंदरांमध्ये मोठ्याप्रमाणात निर्यात करण्यात येत असलेला माल अडकून पडला आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे कच्च्या तेलाची वाहतूक ठप्प झालेली आहे. त्याचा परिणाम कच्च्या तेलाच्या किमती वाढण्यात झाला आहे.

जागतिक बाजारपेठेत ब्रेंट क्रूड पुन्हा एकदा संकटकाळात सापडले आहे. अवघ्या काही दिवसांत कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १२० डॉलरच्या दिशेने झेपावल्या आहेत. यामुळे १९७० च्या दशकातील तेल संकटाच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत. दररोज साधारणपणे १०० दशलक्ष बॅरल तेलाचा वापर करणाऱ्या जागतिक बाजारपेठेवर, 'होर्मुझच्या सामुद्रधुनी'तील दीर्घकालीन अडथळ्याचा काय परिणाम होईल, याचा अंदाज आता उद्योग जगत लावू लागले आहेत. या संपूर्ण भीतीचे केंद्र एक अरुंद





समुद्री मार्ग आहे.

'यूएस एनर्जी इन्फॉर्मेशन ॲडमिनिस्ट्रेशन'च्या मते, दररोज साधारणपणे २० दशलक्ष बॅरल तेल आणि पेट्रोलियम पदार्थ होर्मुझच्या सामुद्रधुनीतून वाहून नेले जातात. हे प्रमाण जागतिक तेल वापराच्या २०% आणि समुद्रातून होणाऱ्या एकूण जागतिक तेल व्यापाराच्या २५% पेक्षा जास्त आहे.

यातील बहुतांश तेल आशियाई देशांकडे जाते. चीन, हिंदुस्थान, जपान आणि दक्षिण कोरिया हे देश या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या कच्च्या तेलापैकी अध्यार्हून अधिक तेल आयात करतात. याचा अर्थ असा की, येथे कोणताही अडथळा निर्माण झाल्यास त्याचा पहिला आणि मोठा फटका आशियाई अर्थव्यवस्थांना बसेल.

'द कोबेईसी लेटर' या मार्केट न्यूजलेटरच्या एका व्हायरल चार्टमुळे ही भीती अधिक वाढली आहे. यामध्ये असा इशारा देण्यात आला आहे की, होर्मुझचा मार्ग पूर्णपणे बंद झाल्यास 'इतिहासातील सर्वात मोठा तेल पुरवठा धक्का' बसू शकतो. या संकटाची व्याप्ती थक्क करणारी आहे.

दररोज सुमारे २० दशलक्ष बॅरल तेल पुरवठा धोक्यात येऊ शकतो. तुलना करायची झाल्यास, १९७३ च्या योम किप्पूर युद्धादरम्यान झालेल्या तेल बंदीमुळे जागतिक बाजारपेठेतून दररोज सुमारे ४ ते ५.५ दशलक्ष बॅरल तेल कमी झाले होते. १९७८-७९ च्या इराणी क्रांतीमुळे सुमारे ५ ते ६ दशलक्ष बॅरलचा अडथळा निर्माण झाला होता, तर १९८० मध्ये सुरू झालेल्या इराण-इराक युद्धामुळे दररोज ४ दशलक्ष बॅरल पुरवठा खंडित झाला होता.

केवळ प्रमाणाचा विचार केला, तर होर्मुझची संपूर्ण नाकेबंदी ही पूर्वीच्या प्रत्येक संकटापेक्षा कितीतरी मोठी असेल. परंतु यात एक तांत्रिक बाजूही आहे.

२० दशलक्ष बॅरलचा हा आकडा सर्वात वाईट परिस्थिती गृहीत धरून काढलेला आहे. प्रत्यक्षात, काही जहाजांची वाहतूक सुरू राहू शकते आणि सौदी अरेबिया व संयुक्त अरब अमिरातीसारखे प्रादेशिक उत्पादक या समुद्रधुनीला वळसा घालून पाइपलाइनद्वारे मर्यादित प्रमाणात तेल पाठवू शकतात. तसेच, देशांकडील राखीव साठा हा फटका काहीसा सुसह्य करू शकतो.

तरीही, अंशतः अडथळा देखील किमती गगनाला भिडवू शकतो आणि हिंदुस्थानसारख्या तेल आयातदार देशांसाठी प्रत्यक्ष टंचाईपेक्षा वाढलेल्या किमतींमुळे होणारे नुकसान अधिक असेल.

हिंदुस्थान आपल्या गरजेच्या सुमारे ८५% कच्चे तेल आयात करतो, ज्यामुळे जागतिक किमतींमधील चढ-उतारांचा हिंदुस्थानी अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होतो. देशाच्या रिझर्व्ह बँकेच्या संशोधनानुसार, कच्च्या तेलाच्या किमतीत १०% वाढ झाल्यामुळे महागाई वाढू शकते आणि अल्पकाळात विकासदरात घट होऊ शकते.

ब्रेंट क्रूडची १२० डॉलरकडे होणारी वाटचाल तात्पुरती ठरली, तर हे संकट आटोक्यात राहू शकते.

मात्र, जर या किमती २० ते ३० टक्क्यांनी वाढून दीर्घकाळ टिकून राहिल्या, तर त्याचे पडसाद महागाई, वित्तीय तूट आणि आर्थिक बाजारपेठांवर उमटतील, असा इशारा अर्थतज्ज्ञांनी दिला आहे. यामुळे एक मोठं असं तेल संकट जगाच्या समोर उभं आहे. याचा गंभीर परिणाम अर्थव्यवस्थेवर होईल, महागाई किती वाढेल याचा अंदाज बांधणं देखील आताच्या परिस्थितीत कठीण आहे.

इराण आणि इस्त्रायल यांच्यातील वाढत्या संघषार्मुळे आता जागतिक अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर परिणाम दिसू लागले आहेत. या युद्धाचा थेट फटका खत उद्योगाला बसण्याची शक्यता असून, यामुळे हिंदुस्थानात अन्नधान्य महाग होण्याची भीती निर्माण झाली आहे.

### खतांच्या पुरवठ्यावर परिणाम

इराण हा जगातील खत उत्पादक देशांपैकी एक महत्त्वाचा देश आहे. विशेषतः युरिया आणि इतर रासायनिक खतांच्या उत्पादनात इराणचा मोठा वाटा आहे. युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून, खतांच्या निर्यातीवर मर्यादा आल्या आहेत. हिंदुस्थानसारख्या कृषीप्रधान देशासाठी, जो मोठ्या प्रमाणावर खतांच्या आयातीवर अवलंबून आहे, हे मोठे संकट ठरू शकते.

### हिंदुस्थानसमोर काय आव्हाने आहेत ?

हिंदुस्थानात शेतीचा हंगाम जवळ येत असताना खतांच्या किमती वाढल्यास त्याचा थेट परिणाम शेतीच्या उत्पादन खर्चावर होईल. जर खते महागली, तर सहाजिकच गहू, तांदूळ आणि इतर अन्नधान्यांच्या किमतीत वाढ होईल, ज्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना महागाईचा सामना करावा लागेल.


**3000 Sq.ft. प्लॉट N.A. देणे आहे**
शिनगारे सिटी सांगोला
वासुद रोड, अल्टिमेट जिम च्या पूर्वेस
संपर्क :
डी. बी. शिंदे
9579421465


# 'देशाला नेतृत्व हवे, मौन नको'

## संसद भवनासमोर विरोधी पक्षाच्या खासदारांचे आंदोलन

**नवी दिल्ली, (वृत्त सेवा):-** देशातील वाढते इंधन दर, आखाती देशांतील तणाव आणि त्याचा भारतावर होणारा परिणाम याच्या निषेधार्थ विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, खासदार प्रियांकाजी गांधी, सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्यासह काँग्रेस व विरोधी पक्षांच्या खासदारांनी आज संसद भवन परिसरात निदर्शने केली.

यावेळी खासदारांनी हातात विविध घोषवाक्यांचे फलक घेऊन केंद्र सरकारच्या भूमिकेवर टीका केली. "Gulf Burning, Oil Shock, Indians Stranded – India Needs Leadership, Not Silence", 'देश को नेतृत्व चाहिए, मौन नहीं..', 'मोदी जी कुछ बोलिए, 46 लाख देशवासी गल्फ में फंसे हैं' अशा आशयाचे फलक आंदोलनादरम्यान दाखवण्यात आले.



विरोधी पक्षांच्या खासदारांनी आखाती देशांतील तणावामुळे वाढलेल्या तेलदरांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम आणि परदेशात अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित केला. या विषयावर केंद्र सरकारने स्पष्ट भूमिका घ्यावी तसेच संसदेत सविस्तर चर्चा घ्यावी, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनादरम्यान खासदारांनी घोषणाबाजी करत सरकारने मौन न बाळगता देशासमोरील परिस्थितीवर तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी केली.

# सोलापूरात रॅपिड सिटी ग्रुपचे तीन महत्त्वाकांक्षी प्रकल्प

## साडेनऊ कोटींची गुंतवणूक, ३०० जणांना रोजगाराची संधी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुरातून कायार्ची सुरुवात करून अग्निशमन आणि सुरक्षा क्षेत्रात देश-विदेशात ओळख निर्माण केलेल्या रॅपिड सिटी झ्र रॅपिड फायर ग्रुप चे प्रमुख शशांक कुलकर्णी यांनी सोलापुरात तीन महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारण्याची घोषणा केली आहे. या प्रकल्पांमुळे शहरात अत्याधुनिक प्रशिक्षण, सुरक्षा साहित्य निर्मिती तसेच कागदपत्रांच्या सुरक्षित साठवणुकीची सुविधा उपलब्ध होणार असून सुमारे ३०० जणांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळण्याची शक्यता आहे. अशी माहिती शशांक कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.




RAPIDEX®
QUICK AND DEPENDABLE

रॅपिडेक्स या ब्रँडमार्फत रॅपिड फायर ग्रुप देशातील विविध महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी अग्निशमन यंत्रणा उभारणे आणि तिची देखभाल करण्याचे काम करत आहे. सुरक्षा आणि अग्निशमन क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी मागणी असल्याचे लक्षात घेऊन या क्षेत्रात तंत्रशुद्ध शिक्षण देण्याचा उपक्रम सोलापुरातून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### सुरक्षा व अग्निशमन शिक्षणासाठी महाविद्यालय

या उपक्रमांतर्गत सरकार मान्यताप्राप्त सुरक्षा व अग्निशमन अभ्यासक्रमांचे महाविद्यालय सोलापुरात सुरू करण्यात येणार आहे. युवक-युवतींना अत्याधुनिक आणि तंत्रशुद्ध प्रशिक्षण देण्याबरोबरच शिकत असतानाच प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळेल, अशी व्यवस्था येथे करण्यात येणार आहे. गरजूंना माफक शुल्कात किंवा मोफत शिक्षणाची सुविधाही उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले. या माध्यमातून देशात आणि परदेशात काम करू शकणारे कुशल सुरक्षा तंत्रज्ञ तयार करण्याचा उद्देश आहे.

### रेकॉर्ड मॅनेजमेंटसाठी अत्याधुनिक संकुल

दुसऱ्या प्रकल्पांतर्गत बँका, रुग्णालये, विमा कंपन्या आणि इतर संस्थांची महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी अत्याधुनिक रेकॉर्ड मॅनेजमेंट संकुल उभारण्यात येणार आहे. कागदपत्रांना पाणी, कीटक आणि आगीपासून संरक्षण मिळावे यासाठी 'हायपॉक्सिक एअर' सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे कागदपत्रे वर्षानुवर्षे सुरक्षित राहतील आणि आवश्यकतेनुसार संबंधित संस्था व त्यांच्या ग्राहकांना तत्काळ उपलब्ध करून देता येतील. महाराष्ट्रात दोन आणि कर्नाटकात दोन अशा एकूण चार ठिकाणी अशी संकुले उभारण्याची योजना असून त्याची सुरुवात सोलापुरातून होणार आहे.

### सुरक्षा साहित्य निर्मिती प्रकल्प

तिसऱ्या प्रकल्पांतर्गत सोलापूर एमआयडीसी परिसरात सुरक्षा साहित्य निर्मितीचा उद्योग उभारण्याची तयारी करण्यात आली आहे. सध्या अग्निशमन आणि सुरक्षा उपकरणांसाठी लागणारे अनेक साहित्य गुजरात, दिल्ली, दुबई आणि इंग्लंड येथून मागवावे लागते. सोलापुरातील कुशल कास्टिंग कामगार, वस्त्र उद्योगातील तज्ज्ञ मनुष्यबळ आणि उपलब्ध औद्योगिक कौशल्य लक्षात घेऊन येथेच सुरक्षा साहित्य निर्मिती करण्याचा निर्णय घेतल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले.

### साडेनऊ कोटींची प्राथमिक गुंतवणूक

या तिन्ही प्रकल्पांसाठी सुमारे साडेनऊ कोटी रुपयांची प्राथमिक गुंतवणूक करण्यात येणार आहे. या उपक्रमांचा मुख्य उद्देश म्हणजे जागतिक स्तरावर मागणी असलेले प्रशिक्षित युवक तयार करणे आणि सोलापुरात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे हा आहे.

'गेल्या वीस वर्षांपासून सुरक्षा आणि अग्निशमन क्षेत्रात काम करताना लोकांचे जीवन सुरक्षित करण्याचा प्रयत्न करत आहे. याच अनुभवाचा उपयोग करून तरुण पिढीला स्वरक्षा आणि सुरक्षा क्षेत्रात प्रगतीची संधी मिळावी, या उद्देशाने माझ्या जन्मभूमी असलेल्या सोलापुरात हे प्रकल्प उभे राहत आहेत,' असे शशांक कुलकर्णी यांनी सांगितले.

सोलापुरातील कुशल व तंत्रज्ञान जाणणारे मनुष्यबळ या तिन्ही प्रकल्पांना गती देईल आणि भविष्यात जागतिक स्तरावरही सुरक्षा क्षेत्रात योगदान देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या पत्रकार परिषदेला अर्जुन चव्हाण उपस्थित होते.

# CID चौकशी की 'शाही पाहुणचार'?

## VSR कंपनीचे मालक व्ही. के. सिंग यांच्याबाबत रोहित पवारांचा गंभीर सवाल

**मुंबई (कटूसत्य वृत्त) :-** अजितदादा यांच्या दुर्दैवी मृत्यूशी संबंधित अपघात प्रकरणात VSR कंपनीचे मालक व्ही. के. सिंग यांना CID ने चौकशीसाठी बोलावले होते की त्यांना शाही पाहुणचार देण्यात आला, असा गंभीर सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणातील चौकशी प्रक्रियेवरच आता संशय निर्माण झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. रोहित पवार यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, (पान 2 वर..)






**VNP MOTORS**
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार – SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार – SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL – HATCHBACK RS. 2500/- | SEDAN - 3000/- | SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG – RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007


# महिला महोत्सव २०२६ चे भव्य उद्घाटन; ४० महिला बचत गटांचा उत्स्फूर्त सहभाग

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभाग तसेच ऊस -ठवछट यांच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या 'महिला महोत्सव व सांस्कृतिक कार्यक्रम २०२६' या भव्य महोत्सवाचा उद्घाटन समारंभ आज इंद्रभुवन परिसर, सोलापूर येथे उत्साहात पार पडला. या महोत्सवाचे उद्घाटन सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, गटनेते वाहिदा बानो शेख, गटनेते अमोल शिंदे, चेतन नरोटे गटनेते वैभव हातुरे, आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्यासह सोलापूर महानगरपालिकेचे सर्व सन्माननीय नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



उद्घाटन प्रसंगी बोलताना महापौर विनायक कोंड्याल म्हणाले की, महिलांचे सक्षमीकरण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे मुख्य आधार आहे. महिलांनी शिक्षण, उद्योग, कला आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत समाजाच्या प्रगतीत मोठा वाटा उचलला आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून अशा महोत्सवांमुळे महिलांच्या कौशल्याला व कर्तृत्वाला व्यापक व्यासपीठ मिळते, असे त्यांनी सांगितले.

या महिला महोत्सवामध्ये शहरातील तब्बल ४० महिला बचत गटांनी सहभाग घेत आपल्या विविध उत्पादनांचे स्टॉल्स उभारले आहेत. यावेळी महापौर विनायक कोंड्याल तसेच उपस्थित मान्यवरांनी प्रत्येक स्टॉलला भेट देत महिला बचत गटांच्या उपक्रमांची पाहणी केली तसेच त्यांच्या कामाचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले.महिला महोत्सवाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा, महिला बचत गटांचे उपक्रम तसेच महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून हा महोत्सव दि. ०९ मार्च ते ११ मार्च २०२६ या कालावधीत इंद्रभुवन परिसर येथे पार पडणार आहे.

## संपादकीय

# प्राप्तकाल विशाल, पण पाया किती भक्कम?

'प्राप्तकाल हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयात खोदा' हा सुविचार पूर्वी शालेय विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी सांगितला जात असे. काळ बदलला असला तरी या वचनाचा आशय आजही तितकाच लागू पडतो. मात्र आजच्या शासनव्यवस्थेसाठी या वचनाचा अर्थ थोडा बदलावा लागेल — 'प्राप्तकाल हा विशाल भूधर, पायाभूती तयात खोदा.' महाराष्ट्राच्या ताज्या अर्थसंकल्पाकडे पाहिले असता हा बदललेला अर्थ अधिक प्रकर्षाने जाणवतो. कारण या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांच्या उभारणीला दिलेला भर. आज देशभरात पायाभूत सुविधांचा विस्तार हा विकासाचा प्रमुख मंत्र बनला आहे. मोठमोठे रस्ते, पूल, मेट्रो, उंच इमारती, तसेच 'जगात सर्वात मोठे', 'सर्वात उंच', 'सर्वात वेगवान' अशा दाव्यांच्या स्पर्धेत विकासाची व्याख्या मोजली जात आहे. महाराष्ट्राचाही अर्थसंकल्प या प्रवाहापासून वेगळा नाही. राज्याच्या आर्थिक आराखड्यात पायाभूत सुविधा, सिंचन आणि विकासकामांवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला आहे. यंदाचा अर्थसंकल्प मुळात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडण्याची शक्यता होती; मात्र त्यांच्या अकाली जाण्यानंतर अर्थखाते मुख्यमंत्र्यांनी स्वतःकडे ठेवले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या इतर सहकाऱ्यांकडे हे महत्त्वाचे खाते न देण्याचा निर्णय हा राजकीय दृष्ट्या सूचक ठरतो. सहकारी पक्षातील खातेवाटपाच्या मर्यादा ओलांडून मुख्यमंत्री यांनी अर्थखाते स्वतःकडे ठेवणे हा राजकीयदृष्ट्या दूरदृष्टीचा निर्णय मानला जातो. अर्थसंकल्पापूर्वीच शेतकरी कर्जमाफीची घोषणा होणार याची चिन्हे दिसू लागली होती. यापूर्वी २०१७ मधील सुमारे ३१ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी आणि २०२४ मधील जवळपास २० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी राज्य सरकारने दिली आहे. आता जाहीर झालेली ही तिसरी कर्जमाफी राज्याच्या तिजोरीवर आणखी मोठा भार टाकणार आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या उद्देशाने घेतलेला हा निर्णय असला तरी दीर्घकालीन दृष्टीने तो प्रश्न निर्माण करणारा आहे. एक महत्त्वाचा प्रश्न येथे उपस्थित होतो — ज्यांनी आधीच्या कर्जमाफीचा लाभ घेतला आहे त्यांना पुन्हा त्याच सवलती द्याव्यात का? जर असेच सुरू राहिले तर 'कर्ज घ्या आणि माफीची वाट पाहा' असा नवा पायंडा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रत्यक्षात शेतकऱ्यांना कर्जमाफीपेक्षा त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारभाव आणि स्थिर उत्पन्नाची गरज आहे. मात्र ते साध्य करण्यात अपयश आल्याने राजकीय पक्ष कर्जमाफीच्या घोषणांकडे वळतात. कर्जमाफी वगळता कृषी क्षेत्रासाठी काही सकारात्मक उपाययोजना या अर्थसंकल्पात दिसतात. कृषी क्षेत्रातील मूल्यसाखळी मजबूत करणे, कृषी विद्यापीठांना अधिक सक्षम करणे, तसेच शेतीत भांडवली गुंतवणूक वाढवण्याचे प्रयत्न हे त्यातील उल्लेखनीय मुद्दे आहेत. मात्र कर्जमाफीच्या घोषणेच्या गदारोळात हे महत्त्वाचे मुद्दे दुर्लक्षित राहण्याची शक्यता आहे. सिंचन क्षेत्रावरही सरकारने विशेष भर दिला आहे. नवीन सिंचन योजना, नदीजोड प्रकल्प आणि स्थानिक पातळीवर पाणी वळविण्याचे प्रयत्न या योजनांचा भाग आहेत. तथापि या सर्व योजनांनंतर राज्यातील प्रत्यक्ष सिंचनाखालील क्षेत्र किती वाढले, याची स्पष्ट माहिती देण्यात सरकार अद्यापही कमी पडते. पारदर्शकतेच्या दृष्टीने ही बाब महत्त्वाची ठरते. दरम्यान राज्याच्या आर्थिक स्थितीची चिंताजनक बाजूही लक्षात घ्यावी लागेल. पुढील वर्षापर्यंत महाराष्ट्रावरील कर्ज ११ लाख कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. या कर्जावरील व्याजासाठीच सुमारे ६५ हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत. वेतन, निवृत्तिवेतन आणि इतर अनिवार्य खर्च मिळून राज्याच्या महसुलातील जवळपास ५५ टक्के रक्कम खर्च होते. उरलेल्या मर्यादित निधीतून विकासाची मोठी उद्दिष्टे साध्य करणे ही मोठी कसोटी ठरणार आहे. राज्याचे उद्दिष्ट एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याचे आहे. सध्या महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सुमारे ५१–५२ लाख कोटी रुपयांची आहे. त्यामुळे हे लक्ष्य गाठण्यासाठी जवळपास दुप्पट वाढ आवश्यक आहे. तसेच २०४७ पर्यंत 'विकसित भारत' संकल्पनेत महाराष्ट्राचा मोठा वाटा असावा, अशी अपेक्षा आहे. मात्र सध्याची सुमारे ४० हजार कोटी रुपयांची वित्तीय तूट पाहता हा प्रवास आव्हानात्मक ठरणार आहे. अशा परिस्थितीत लोकानुनयी योजनांवर किती खर्च करायचा आणि दीर्घकालीन विकासासाठी किती गुंतवणूक करायची याचा समतोल साधणे आवश्यक ठरेल. दक्षिण भारतातील तमिळनाडू, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश ही राज्ये औद्योगिक व आर्थिक स्पर्धेत झपाट्याने पुढे जात आहेत. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी महाराष्ट्राला अधिक वेगाने आणि दूरदृष्टीने पावले उचलावी लागतील. थोडक्यात, महाराष्ट्राचा अर्थसंकल्प पायाभूत सुविधांवर आधारित विकासाची दिशा दाखवतो. मात्र या विशाल भूधरावर उभा राहणारा विकासाचा महाल खरोखरच टिकाऊ ठरावा, यासाठी आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि दूरदृष्टीची भक्कम पायाभरणी करणे तितकेच आवश्यक आहे.

# राष्ट्रपतींचा प्रोटोकॉल आणि राजकारण

देशातील राजकारणात अनेकदा एखाद्या घटनेवरून नैतिकतेची आणि प्रोटोकॉलची चर्चा रंगते. मात्र या चर्चेत सातत्य असणे आणि सर्वांसाठी समान निकष लावणे तितकेच महत्त्वाचे असते. अलीकडे ममता बॅनर्जी यांच्या एका कार्यक्रमातील वर्तनावरून मोठ्या प्रमाणात टीका होताना दिसते. पण या टीकेदरम्यान काही मूलभूत प्रश्न उपस्थित होतात. जेव्हा देशातील सर्वोच्च घटनात्मक पदाचा मान राखण्याचा प्रश्न येतो, तेव्हा राजकारणातील सर्वच पक्ष आणि नेते समान भूमिका घेतात का?

देशाच्या राष्ट्रपतीपदावर विराजमान असलेल्या द्रौपदी मुर्मु या संविधानिक दृष्ट्या राष्ट्राच्या सर्वोच्च पदावर आहेत. राष्ट्रपती हे देशाचे पहिले नागरिक मानले जातात आणि त्यांचा प्रोटोकॉल पंतप्रधानांसह सर्व मंत्री आणि पदाधिकाऱ्यांपेक्षा वरचा असतो. त्यामुळे कोणत्याही मोठ्या राष्ट्रीय कार्यक्रमात किंवा प्रतीकात्मक समारंभात राष्ट्रपतींची उपस्थिती ही केवळ औपचारिक बाब नसून ती घटनात्मक सन्मानाशी संबंधित असते.

अशा परिस्थितीत काही महत्त्वाच्या राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये राष्ट्रपतींना निमंत्रण देण्यात आले नाही, हा मुद्दा अनेकदा चर्चेत आला. विशेषतः राम मंदिर येथील प्राणप्रतिष्ठा सोहळा असो किंवा संसद भवन (Parliament House of India) च्या उद्घाटनाचा कार्यक्रम या दोन्ही ऐतिहासिक प्रसंगांमध्ये राष्ट्रपतींची अनुपस्थिती लक्षवेधी ठरली. या घटनांवर त्या वेळी विरोधी पक्षांनी खूप मोठया प्रमाणात आवाज उठवला मात्र काहीही दखल घेतली गेला नाही, हेही वास्तव आहे. राजकीय आरोप–प्रत्यारोपांच्या वातावरणात हा प्रश्न उपस्थित होतो की, जेव्हा राष्ट्रपतींच्या प्रोटोकॉलचा प्रश्न स्वतःच्या राजकीय सोयीप्रमाणे दुर्लक्षित केला जातो, तेव्हा दुसऱ्यांच्या कृतींवर कठोर टीका करण्याचा नैतिक अधिकार कितपत उरतो? जर एखाद्या नेत्याने किंवा सरकारने राष्ट्रपतींच्या सन्मानाकडे दुर्लक्ष केले असेल, तर त्यावरही तितक्याच तीव्रतेने प्रश्न उपस्थित व्हायला हवेत. याचा अर्थ असा नाही की ममता बॅनर्जी यांच्या वर्तनाचे समर्थन केले पाहिजे. सार्वजनिक जीवनात असलेल्या प्रत्येक नेत्याने घटनात्मक पदांचा आणि राष्ट्रीय प्रतीकांचा सन्मान राखणे हे अत्यावश्यक आहे. जर कुणाकडून चूक झाली असेल, तर त्यावर टीका होणे स्वाभाविक आणि आवश्यकही आहे. मात्र ती टीका करताना समान निकष आणि नैतिक सातत्य ठेवणे हे लोकशाहीच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे ठरते. लोकशाही व्यवस्थेत केवळ विरोधकांवर बोट ठेवणे सोपे असते, पण स्वतःच्या भूमिकेचे आत्मपरीक्षण करणे अधिक आवश्यक असते. राष्ट्रपती, संसद, न्यायव्यवस्था यांसारख्या संस्थांचा सन्मान हा पक्षनिष्ठेच्या पलीकडे जाऊन जपला गेला पाहिजे. अन्यथा प्रोटोकॉल, परंपरा आणि संविधानिक मूल्ये ही केवळ राजकीय सोयीची साधने बनण्याचा धोका निर्माण होतो. आजची गरज ही कोणावर आरोप करण्याची नाही, तर सार्वजनिक जीवनातील सर्व घटकांनी घटनात्मक मूल्यांविषयी समान संवेदनशीलता दाखवण्याची आहे. राष्ट्रपतीपदाचा सन्मान हा कोणत्याही राजकीय अजेंड्यापेक्षा मोठा आहे. तो जपणे ही प्रत्येक राजकीय पक्ष, सरकार आणि नेत्याची सामूहिक जबाबदारी आहे.

लोकशाहीत नैतिकता ही निवडक नसून सर्वसमावेशक असली पाहिजे. तेव्हाच टीका विश्वासार्ह ठरते आणि जनतेचा राजकीय व्यवस्थेवरील विश्वास टिकून राहतो.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले : स्त्रीशिक्षणाच्या प्रकाशवाटेच्या शिल्पकार

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांनी आपल्या धैर्य, दूरदृष्टी आणि निःस्वार्थ कार्यातून समाजाच्या विचारविश्वाला नवे परिमाण दिले. स्त्रीशिक्षणाचा पाया रचणाऱ्या, सामाजिक समतेचा विचार रुजवणाऱ्या आणि मानवतेच्या मूल्यांना जीवनकार्याचे स्वरूप देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव त्या थोर व्यक्तिमत्त्वांमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते. स्त्रीला शिक्षणाचा अधिकार नसलेल्या, जातिभेद आणि अंधश्रद्धांच्या जोखडात अडकलेल्या भारतीय समाजात त्यांनी प्रबोधनाची ज्योत पेटवली. स्त्रीला शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. १० मार्च हा दिवस त्यांच्या स्मृतिदिनाच्या रूपाने साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका महान समाजसुधारकाची आठवण करून देणारा दिवस नसून स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि मानवतेच्या मूल्यांची जपणूक करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे एका साध्या शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे वडील खंडोजी नेवसे आणि आई लक्ष्मीबाई नेवसे हे कष्टाळू आणि साधे स्वभावाचे होते. त्या काळात भारतीय समाजात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. स्त्रीचे आयुष्य घरकाम, कुटुंबाची सेवा आणि सामाजिक बंधनांच्या चौकटीत मर्यादित ठेवले जात असे. बालविवाह, विधवांवरील अन्याय, स्त्रीशिक्षणाचा अभाव आणि जातीय विषमता या समस्या समाजात खोलवर रुजलेल्या होत्या. अशा वातावरणात सावित्रीबाईंचे बालपण गेले. लहान वयातच त्यांचा विवाह महात्मा ज्योतिराव फुले यांच्याशी झाला. हा विवाह सावित्रीबाईंच्या आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण वळण ठरला. महात्मा ज्योतिराव फुले हे अत्यंत प्रगत विचारांचे समाजसुधारक होते. त्यांनी समाजातील अन्यायकारक परंपरांना आव्हान देण्याचा धाडसी मार्ग स्वीकारला होता. विवाहानंतर त्यांनी सावित्रीबाईंना शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्या काळातील सामाजिक परिस्थिती लक्षात घेतली तर हा निर्णय अत्यंत क्रांतिकारक होता. समाजातील अनेक लोकांनी या निर्णयाचा विरोध केला. परंतु ज्योतिराव फुले यांनी सामाजिक टीकेची पर्वा न करता सावित्रीबाईंना शिक्षण दिले. सावित्रीबाईंनीही अत्यंत मेहनतीने शिक्षण घेतले आणि पुढे त्या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका बनल्या. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव होती.

१८४८ साली पुण्यातील भिडेवाडा येथे सावित्रीबाई फुले आणि ज्योतिराव फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. ही घटना भारतीय शिक्षणाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानली जाते. त्या काळात मुलींना शाळेत पाठवणे हे समाजाच्या दृष्टीने अत्यंत अनुचित मानले जात होते. सावित्रीबाई शाळेत जात असताना अनेक लोक त्यांच्यावर दगड, चिखल आणि गोमूत्र फेकत असत. त्यांना अपमानास्पद शब्दांनी हिणवले जात असे. परंतु या सर्व अपमानांना न जुमानता सावित्रीबाई दररोज शाळेत जात राहिल्या. त्या आपल्या पिशवीत दोन साड्या घेऊन जात असत. एखादी साडी खराब झाली तर दुसरी साडी नेसून त्या पुन्हा वर्गात जाऊन मुलींना शिकवण्याचे काम सुरू करत असत. त्यांच्या या धैर्यामुळे आणि चिकाटीमुळे स्त्रीशिक्षणाची ज्योत अखंड प्रज्वलित राहिली. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा



प्रसार करताना समाजातील दलित, शोषित आणि वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. त्या काळात जातिव्यवस्था अत्यंत कठोर होती आणि खालच्या जातींतील लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. शिक्षण ही केवळ उच्चवर्णीयांची मक्तेदारी मानली जात होती. परंतु सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले यांनी या अन्यायकारक व्यवस्थेला आव्हान दिले. त्यांनी दलित मुलांसाठी आणि मुलींसाठी अनेक शाळा सुरू केल्या. त्यांच्या प्रयत्नांमुळे समाजातील दुर्लक्षित घटकांना शिक्षणाची संधी मिळाली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजात समता निर्माण करता येईल, असा त्यांचा ठाम विश्वास होता.

सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठीही मोठा संघर्ष केला. त्या काळात विधवा स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. समाजाने त्यांच्यावर अनेक बंधने लादली होती. विधवांना शिक्षण घेण्याची किंवा पुनर्विवाह करण्याची संधी नव्हती. अनेक वेळा अविवाहित किंवा विधवा स्त्रियांना समाजाच्या भीतीने नवजात बालकांची हत्या करण्यास भाग पाडले जात असे. या अमानुष प्रथेला आळा घालण्यासाठी सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले यांनी पुण्यात 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केले. येथे अवांछित किंवा अनाथ बालकांना सुरक्षित आश्रय दिला जात असे. या कार्यामुळे अनेक बालकांचे प्राण वाचले आणि अनेक स्त्रियांना सन्मानाने जगण्याची संधी मिळाली. सावित्रीबाई फुले या केवळ शिक्षिका नव्हत्या तर त्या एक संवेदनशील कवयित्रीही होत्या. त्यांच्या 'काव्यफुले' आणि 'बावनकशी सुबोध रत्नाकर' या काव्यसंग्रहांमधून समाजजागृतीचा प्रभावी संदेश दिला आहे. त्यांच्या कवितांमध्ये शिक्षणाचे महत्त्व, आत्मसन्मान, सामाजिक समता आणि मानवतेचा विचार स्पष्टपणे दिसून येतो. अज्ञानाच्या अंधारातून बाहेर पडण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे, हा संदेश त्यांनी आपल्या साहित्यामधून समाजापर्यंत पोहोचवला.

सावित्रीबाई फुले यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतला. सत्यशोधक समाजाचा उद्देश समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि अन्यायकारक प्रथा दूर करून समतेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करणे हा होता. सावित्रीबाई फुले यांनी या चळवळीच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये आत्मविश्वास आणि स्वाभिमान जागृत करण्याचे कार्य केले. त्यांनी स्त्रियांना स्वतःच्या अधिकारांची जाणीव करून दिली आणि समाजातील अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली.

सावित्रीबाई फुले यांच्या आयुष्यातील आणखी एक महत्त्वपूर्ण पैलू म्हणजे त्यांची मानवसेवा. १८९७ साली पुण्यात प्लेगची भीषण साथ पसरली होती. त्या काळात अनेक लोक आजारी लोकांपासून दूर राहू लागले होते. परंतु सावित्रीबाई फुले यांनी समाजसेवेचा आदर्श घालून दिला. त्यांनी प्लेगग्रस्त लोकांची सेवा करण्यासाठी पुढाकार घेतला. त्या आजारी लोकांना स्वतः खांद्यावर उचलून दवाखान्यात घेऊन जात असत. या सेवाकार्यात त्यांना प्लेगचा संसर्ग झाला आणि १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. समाजसेवेच्या कार्यात स्वतःचे प्राण अर्पण करणाऱ्या या महान स्त्रीचे जीवन खऱ्या अर्थाने मानवतेच्या सेवेसाठी समर्पित होते.

सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा प्रभाव आजच्या भारतीय समाजावरही स्पष्टपणे दिसून येतो. आज स्त्रीशिक्षणाला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जाते. मुली शिक्षणाच्या विविध क्षेत्रांमध्ये प्रगती करत आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, राजकारण, साहित्य, कला आणि क्रीडा अशा अनेक क्षेत्रांमध्ये महिलांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या सर्व परिवर्तनामागे सावित्रीबाई फुले यांच्यासारख्या समाजसुधारकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी पेटवलेली शिक्षणाची ज्योत आज लाखो मुलींच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करत आहे.

आजच्या आधुनिक समाजातही स्त्री–पुरुष असमानता, शिक्षणातील विषमता आणि सामाजिक भेदभाव पूर्णपणे नाहीसे झालेले नाहीत. ग्रामीण भागात अजूनही अनेक मुलींना शिक्षणाच्या संधी मर्यादित प्रमाणात मिळतात.

महिलांवरील अत्याचार, लैंगिक भेदभाव आणि सामाजिक रूढींचा प्रभाव अजूनही काही प्रमाणात दिसून येतो. त्यामुळे सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची आणि कार्याची आवश्यकता आजही तितकीच महत्त्वाची आहे. त्यांच्या विचारांमधून समाजाला समतेचा, शिक्षणाचा आणि मानवतेचा मार्ग दिसतो.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या भारतीय स्त्रीशक्तीचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी समाजातील जाचक परंपरांना आव्हान देऊन स्त्रीला शिक्षण, स्वाभिमान आणि समानतेचा मार्ग दाखवला. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजात सामाजिक परिवर्तनाची नवी दिशा निर्माण झाली. त्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे ज्ञान, समता आणि मानवतेचा मार्ग होय.

१० मार्च हा दिवस सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने आपण त्यांच्या महान कार्याचे स्मरण करतो. परंतु त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे होय. समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, स्त्री–पुरुष समानतेची जाणीव वाढवणे आणि मानवी मूल्यांवर आधारित समाजरचना निर्माण करणे ही आजच्या काळातील महत्त्वाची गरज आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन म्हणजे संघर्ष, धैर्य, समर्पण आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणादायी गाथा आहे. त्यांनी आयुष्यभर शिक्षण, समता आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजाला नवी दिशा मिळाली. म्हणूनच सावित्रीबाई फुले यांचे नाव भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासात सदैव आदराने घेतले जाईल. त्यांच्या स्मृतिदिनी आपण त्यांच्या कायार्चा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून अधिक न्याय्य, समताधिष्ठित आणि शिक्षित समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहणे हीच त्यांना अर्पण केलेली खरी श्रद्धांजली ठरेल.



डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# नाभिक सेवा प्रतिष्ठानने केला महिला दिनी उपमहापौरांचा सत्कार




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** सोलापूरच्या प्रथम नागरिक, उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरीताई देवकर यांना सोलापुरातील तमाम महिलांच्या प्रतिनिधी या नात्याने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून श्रीवास्तव नाभिक समाज युवा महिला सेवा प्रतिष्ठानच्या वतीने गौरवान्वित करण्यात आले.

सत्काराप्रसंगी बोलताना त्या म्हणाल्या, "नाभिक समाजातील महिलांना अनेक अडचणींशी सामना करावा लागत आहे. समाजाच्या भल्यासाठी तुम्ही संघटित होऊन लढताना पाहून मनापासून कौतुक वाटते. माज्या कक्षेतील समस्या सोडवण्यासाठी मला हाक द्या. महापालिकेत माज्याकडे जरूर या, मी तुमच्यासाठी नक्कीच प्रयत्न करेन आणि सोबत राहीन."

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साधनाताई हिरापूरकर होत्या. यावेळी महिला संघटक सौ. वनिता मालतुमकर यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यक्रमाचा उद्देश, महिला दिनाचे महत्व आणि प्रतिष्ठानच्या वाटचालीची माहिती दिली.

या निमित्ताने देवकरताई यांच्या हस्ते वत्सला गोगी, कविता मालतुमकर, दिपाली श्रीमंगले, विनिता मॅकलवार, रूपा वड्डेपल्ली, पार्वती वनस्कर, प्रेरणा कट्टिमणी, शैलाकाकु मालतुमकर, जयश्री मॅकलवार, सारीका मॅकलवार, मधुमती मॅकलवार आदींचा विशेष योगदानाबद्दल गौरव करण्यात आला. नागवेणी भरतनूर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्तात्रय श्रीमंगले, युवराज मालतूमकर, राजकुमार मालतुमकर, किरण सर्दनकर यांनी विशेष सहकार्य केले.

# कर्जमाफीच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक २०२९ मध्ये जनता उत्तर देईल – ॲड. शंकर चव्हाण

**मुंबई (कटूसत्य वृत्त) :–** राज्यातील शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जमाफीच्या आश्वासनांवरून युती सरकारवर तीव्र टीका करत मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता ॲड. शंकर चव्हाण यांनी सरकारवर शब्दभंगाचा आरोप केला आहे. 'कर्जमाफीच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली असून २०२९ च्या निवडणुकीत महाराष्ट्राची जनता या विश्वासघाताला निश्चित उत्तर देईल,' असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. सोशल मीडियावर केलेल्या आपल्या प्रतिक्रियेतून त्यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या स्थितीकडे लक्ष वेधत सरकारच्या धोरणांवर कठोर शब्दांत टीका केली.

ॲड. शंकर चव्हाण यांनी म्हटले की, निवडणुकीपूर्वी राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. अनेक शेतकऱ्यांनी त्या आश्वासनांवर विश्वास ठेवून सरकारकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. मात्र प्रत्यक्षात जाहीर झालेल्या कर्जमाफी योजनेत फक्त दोन लाख रुपयांपर्यंतची मयार्दा ठेवण्यात आली आणि त्यामुळे मोठ्या संख्येने शेतकरी या योजनेच्या कक्षेबाहेर राहिले. 'शेतकऱ्यांच्या डोक्यावर असलेले कजार्चे ओझे इतके मोठे आहे की दोन लाखांची मर्यादा म्हणजे त्यांच्या जखमेवर पाण्याचे शिंतोडे मारण्यासारखीच आहे,' अशी तीव्र टीका त्यांनी केली.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्रातील शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून संकटांचा सामना करत आहेत. कधी



अवकाळी पाऊस, कधी दुष्काळ, तर कधी पिकांना योग्य भाव न मिळणे अशा अनेक अडचणींमुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या कमकुवत होत चालले आहेत. उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना बाजारभाव मात्र स्थिर राहत नाहीत. खत, बियाणे, कीटकनाशके आणि इतर शेतीसंबंधी साहित्याच्या किंमती वाढल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. अशा परिस्थितीत सरकारने मोठा आणि ठोस निर्णय घेणे अपेक्षित होते, असे ॲड. चव्हाण यांनी नमूद केले.

त्यांच्या मते, कर्जमाफी हा केवळ आर्थिक मुद्दा नाही, तर शेतकऱ्यांच्या अस्तित्वाशी जोडलेला प्रश्न आहे. 'शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्याच्या श्रमावर संपूर्ण देश उभा आहे. परंतु आज त्यालाच जगण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे,' असे त्यांनी सांगितले. शेतकरी कर्जाच्या ओज्याखाली दबलेला असताना सरकारने त्यांना दिलासा देण्याऐवजी मर्यादित कर्जमाफी जाहीर करून जबाबदारी झटकली, असा आरोप त्यांनी केला.

ॲड. शंकर चव्हाण यांनी पुढे सांगितले की, राज्यातील अनेक शेतकरी अजूनही बँकांच्या आणि सावकारांच्या कर्जाच्या चक्रात अडकलेले आहेत. काही ठिकाणी शेतकऱ्यांना कर्ज फेडण्यासाठी जमीन विकावी लागते, तर काही ठिकाणी आत्महत्यांसारखे टोकाचे निर्णय घेतले जातात. 'ही परिस्थिती अत्यंत वेदनादायक आहे. सरकारने या प्रश्नाकडे संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक होते,' असे त्यांनी म्हटले. सरकारच्या आश्वासनांबाबत बोलताना ते म्हणाले,'जस ठरलं तस झालं नाही. महाराष्ट्राच्या जनतेला आणि शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळला गेला नाही. ही केवळ राजकीय चूक नाही, तर जनतेच्या विश्वासाचा विश्वासघात आहे.'' निवडणुकांपूर्वी मोठमोठ्या घोषणा करून सत्तेत आल्यानंतर त्या पूर्ण न करणे ही जनतेशी केलेली फसवणूक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ॲड. चव्हाण यांनी सरकारला आवाहन करताना सांगितले की, शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी व्यापक आणि दीर्घकालीन धोरणे आखणे आवश्यक आहे. फक्त कर्जमाफी जाहीर करून समस्या संपत नाही. शेतीमालाला हमीभाव, बाजारपेठेतील स्थैर्य, सिंचन व्यवस्था, शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा यावरही सरकारने लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. 'जर शेतकऱ्यांना योग्य दर आणि स्थिर उत्पन्न मिळाले, तर कर्जमाफीची गरजच पडणार नाही,' असे त्यांनी नमूद केले.

सोशल मीडियावर त्यांनी केलेल्या विधानात २०२९ च्या निवडणुकीबाबतही स्पष्ट इशारा दिला आहे. 'महाराष्ट्रातील जनता सर्व काही पाहत आहे. शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने पूर्ण झाली नाहीत, हे जनतेच्या लक्षात आले आहे. त्यामुळे २०२९ च्या निवडणुकीत जनता नक्कीच या प्रश्नावर आपला निर्णय देईल,'असे त्यांनी म्हटले. ते पुढे म्हणाले की, लोकशाही व्यवस्थेत जनतेचा विश्वास हा सर्वात मोठा आधार असतो. जर सरकारने दिलेला शब्द पाळला नाही, तर त्या सरकारवरील विश्वास कमी होतो. 'खोट्या आश्वासनांवर राजकारण करून सत्ता मिळवणे शक्य असले, तरी दीर्घकाळ जनतेचा विश्वास टिकवणे अशक्य असते,' असे त्यांनी स्पष्ट केले. अखेरीस ॲड. शंकर चव्हाण यांनी राज्य सरकारला पुन्हा एकदा आवाहन केले की, शेतकऱ्यांच्या समस्यांकडे गांभीयार्ने लक्ष द्यावे. सरसकट कर्जमाफीसह शेतीसंबंधी व्यापक सुधारणा करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. अन्यथा वाढता असंतोष आणि नाराजी भविष्यात राजकीय पातळीवर मोठा परिणाम घडवू शकते, असा इशाराही त्यांनी दिला.

'शेतकरी वाचला तरच देश वाचेल. सरकारने हे लक्षात ठेवले पाहिजे,' असे सांगत त्यांनी शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी आवाज उठवत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

पान १ वरून

# CID चौकशी की 'शाही पाहुणचार'?...

व्ही. के. सिंग सकाळी सुमारे ११ वाजता CID कार्यालयात पोहोचले. अधिकृतरीत्या त्यांच्या तब्बल आठ तास चौकशी केल्याचे सांगण्यात आले. मात्र प्रत्यक्षात बहुतांश वेळ त्यांच्या सोयी–सुविधा आणि पाहुणचार करण्यातच गेला, असा आरोप त्यांनी केला आहे.

त्याहूनही गंभीर बाब म्हणजे रात्री उशिरा त्यांना काळ्या काचा लावलेल्या पोलिसांच्या गाडीतून जणू काही एखाद्या मान्यवर पाहुण्याप्रमाणे पाठवण्यात आले. त्यामुळे या चौकशीमागे नेमके काय 'काळंबेरं' आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. 'काळे कारनामे करणाऱ्याला अशा प्रकारे काळ्या काचा असलेल्या गाडीतून सोडण्यामागे नेमकं काय दडलं आहे?' असा प्रश्नही पवार यांनी उपस्थित केला.

रोहित पवार पुढे म्हणाले की, या अपघाताबाबत पीडितांना न्याय मिळवण्यासाठी साधा FIR नोंदवून घेण्यासाठीही संघर्ष करावा लागत आहे. 'एकीकडे आमचा हक्क असूनही या प्रकरणात FIR नोंदवून घेतला जात नाही, तर दुसरीकडे ज्याच्या विमानामुळे अजितदादांना आपण गमावलं त्या व्ही. के. सिंग यांना मात्र VIP ट्रीटमेंट दिली जात आहे. ही वागणूक कुणाच्या आशीर्वादाने दिली जाते?' असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

या प्रकरणाचे वार्तांकन करण्यासाठी उकऊकार्यालयाबाहेर उपस्थित असलेल्या पत्रकारांनाही पोलिसांकडून अयोग्य वागणूक दिल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पत्रकारांना माहिती मिळू नये यासाठी अनावश्यक अडथळे निर्माण करण्यात आले, असेही पवार यांनी नमूद केले.

या सर्व पार्श्वभूमीवर अजितदादांसोबत काम केलेले आणि स्वतःला त्यांचे 'विश्वासू' म्हणवणारे सत्ताधारी आमदार तरी आता या प्रकरणात आवाज उठवतील का, असा सवालही रोहित पवार यांनी केला आहे.

'कितीही काळे पडदे टाकण्याचा प्रयत्न केला तरी या प्रकरणातील सत्याचा सूर्य उगवल्याशिवाय राहणार नाही,' असा इशाराही त्यांनी दिला आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे चौकशी प्रक्रियेची पारदर्शकता आणि प्रशासनाची भूमिका यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, याबाबत अधिकृत पातळीवर स्पष्टीकरण देण्याची मागणीही जोर धरत आहे.

## वात्रटिका

### पतीची निवड

ओढाताण झाली थोडी
आणि कोणी सभापती झाले...
आनंद याचाही काहीना
ते सभापतीचे पती झाले...
बोलघेवडा कोणी, कोणी
राघू तर कोणी मैना आहे...
इकडून तिकडे गेले कोणी
तरीही त्याची दैना आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अकलूजमध्ये भारताच्या विजयानंतर अकलूजकरांचा जल्लोष

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** उदयसिंह क्रीडा मंडळाच्या वतीने अकलूज येथील विजयसिंह क्रीडा संकुलात भारत विरुद्ध न्यूझीलंड या टी-२० विश्वचषक क्रिकेट सामन्याचे थेट प्रक्षेपण मोठ्या एलईडी स्क्रीनवर करण्यात आले. या उपक्रमाला आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, शितलदेवी मोहिते पाटील देवन्या मोहिते पाटील, विश्वतेज मोहिते पाटील, शिवांशिका मोहिते पाटील यांच्यासह अकलूजकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.




अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या सामन्याच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन करण्यात आले होते. क्रिकेटप्रेमींसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. मोठ्या स्क्रीनवर सामना पाहताना प्रत्येक चौकार-षटकारावर प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत भारतीय संघाला जोरदार दाद दिली. सामन्याच्या निर्णायक क्षणी संपूर्ण परिसरात उत्सुकता आणि रोमांचक वातावरण निर्माण झाले होते.

भारताने न्यूझीलंडवर शानदार विजय मिळवताच विजयसिंह क्रीडा संकुल परिसरात आनंदाचा जल्लोष उसळला.

उपस्थित नागरिकांनी एकत्र येत ढोल-ताशा व हलगीच्या निनादात तसेच फटाक्यांची आतषबाजी करत भारताच्या ऐतिहासिक विजयाचा आनंद साजरा केला.

तरुणांसह ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांनीही या जल्लोषात उत्साहाने सहभाग घेतला.

या उपक्रमामुळे अकलूजमध्ये क्रीडाप्रेमी वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी सामूहिकरीत्या सामना पाहण्याचा आनंद लुटला. क्रिकेटप्रेमींसाठी असा उपक्रम आयोजित केल्याबद्दल उपस्थितांनी आयोजकांचे कौतुकही व्यक्त केले.

# उजनी बॅकवॉटर भागातील केळी हार्वेस्टिंग मजूर गावी परतले

**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** अमेरिका आणि इराण यांच्यातील सुरू असलेल्या युद्धामुळे मध्य पूर्वेतील शिपिंग मार्ग विस्कळीत झाल्याने भारतातील, विशेषतः महाराष्ट्रातील केळी निर्यात पूर्णपणे ठप्प झाली आहे.

याचा थेट फटका सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणाच्या बॅकवॉटर (पाणलोट) क्षेत्रातील कंदर, वाशिंबे येथे केळी उत्पादक शेतकऱ्यांसह हार्वेस्टिंगसाठी येणाऱ्या मजुरांवर बसला आहे. या भागातून मोठ्या प्रमाणात निर्यातक्षम केळी उत्पादन होते, पण युद्धामुळे निर्यात बंद पडल्याने हार्वेस्टिंग कामे थांबली असून, मजूर गावी परतले आहेत.



युद्धामुळे शिपिंग लाईन बंद आहेत कोल्ड स्टोरेज फुल झाल्याने हार्वेस्टिंग थांबले आहे. यामुळे शेतकरी मजूर यांना मोठ्या प्रमाणात फटका बसलेला आहे.

**- सुभाष झोळ संचालक**
उजनी ऑर्चर्सड् एक्सपोर्ट कंपनी वाशिंबे

काढणीस आलेल्या निर्यातक्षम केळी बागा निर्यात बंद असल्याने कवडीमोल किंमतीने स्थानिक बाजारपेठेत व्यापाऱ्यांना द्यावे लागत आहेत. शेतकरी वर्ग मोठ्या संकटात सापडलेला आहे.

**- श्यामसुंदर शिंदे,** राजुरी शेतकरी

उजनी धरणाच्या काठावरील टेंभुर्णी, करमाळा परिसरातील केळी बागा 'केळी हब' म्हणून ओळखल्या जातात. येथे हजारो मजूर हंगामी कामासाठी येतात, ज्यात हार्वेस्टिंग, पॅकिंग आणि लोडिंगचे काम असते. सामान्यतः रमजानच्या काळात आखाती देशांना (इराण, इराक, दुबई, सौदी इ.) मोठ्या प्रमाणात केळी निर्यात होते, पण अमेरिका-इराण संघषार्मुळे होर्मुझ सामुद्रधुनी बंद पडल्याने जहाजे माघारी फिरत आहेत. अनेक कंटेनर सोलापूरमधेल परत आले किंवा अडकले आहेत. यामुळे केळी हार्वेस्टिंग पूर्णपणे थांबले आहे. मजूरांचे रोजगार गेले असून, ते आपापल्या मूळ गावी परतले आहेत.

हार्वेस्टिंगसाठी आलेले मजूर आता काम नसल्याने परत गेलेत. केळीच्या बागा काढणीच्या पुढे जात आहेत. निर्यात नसल्याने कापणीच होत नाही.

निर्यात बंद पडल्याने स्थानिक बाजारात केळीचा ओव्हर सप्लाय झाला असून, भाव कोसळले आहेत. नियार्तीचे दर १८ -२४ रुपये प्रति किलो असताना आता ९-१० रुपयांवर आले आहे. उजनी परिसरातील केळी उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत.

# नेताजी प्रशालेत जागतिक महिला दिन उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रविशंकर कुंभार होते. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. सोनाली कांबळे, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, कांचना शिरुर, कल्पना इंगळे, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, जेष्ठ शिक्षिका विजयालक्ष्मी माळवदकर, जयश्री बिराजदार, उमादेवी कुंभार, वैशाली इंडे आदी उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यावेळी महिला दिनानिमित्त उपस्थित सर्व महिलांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी ॲड. सोनाली कांबळे म्हणाले, आजच्या डिजिटल युगात मोबाईल व सोशल मीडियाच्या आहारी न जाता शिक्षणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. परिश्रम, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावरच मोठी स्वप्ने पूर्ण होतात असे ही त्यांनी सांगितले. मुख्याध्यापक रविशंकर कुंभार म्हणाले, प्रत्येक क्षेत्रात अत्ता महिला आरक्षण असल्याने विद्याथीर्नींनी अभ्यास करून आरक्षणाचा फायदा करून घ्यावा. आपल्या प्रशालेतील अनेक विद्यार्थिनी विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत असल्याने आज शाळेला त्यांचा खूप अभिमान वाटतो असे ही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता रामशेट्टी यांनी केले, तर मीनाक्षी वांगीकर यांनी आभार मानले.

# महसूलची वारी शेतकऱ्यांच्या दारी

## नुकसान गाव भरपाई वाटपासाठी भेट दौरा कार्यक्रम

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासन महसूल विभागांतर्गत "महसूलची वारी, शेतकऱ्यांच्या दारी" या उपक्रमाअंतर्गत नाशिक-सोलापूर-अक्कलकोट ग्रीनफिल्ड कॉरीडोर प्रकल्पामुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वाटप करण्यासाठी गाव भेट दौरा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी सीमा होळकर यांनी दिली आहे.

उपजिल्हा धिकारी (भूसंपादन क्र. 11) कार्यालय, कृष्णा खोरे, सोलापूर यांच्या वतीने ज्या शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई नोटीस मिळूनही अद्याप रक्कम स्वीकारलेली नाही, अशा खातेदारांना थेट गावात जाऊन नुकसान भरपाई वाटप करण्याची योजना आखण्यात आली आहे. या दौऱ्यांतर्गत दक्षिण सोलापूर, बार्शी आणि अक्कलकोट तालुक्यातील विविध गावांमध्ये महसूल जनसंवाद कार्यक्रम होणार असून, मंडळ अधिकारी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालये तसेच सांस्कृतिक सभागृह अशा ठिकाणी शेतकऱ्यांना थेट नुकसान भरपाई देण्यात येणार आहे.

**कार्यक्रमाचे वेळापत्रक :**

- दक्षिण सोलापूर : मुस्ती/तिर्थ (9 मार्च), तांदुळवाडी/धोत्री (10 मार्च) - बाशी : वैराग परिसरातील गाव (11 मार्च), अलीपूर परिसरातील गाव (13 मार्च), पानगाव परिसरातील गाव (14 मार्च) - अक्कलकोट : चपळगाव परिसरातील गाव (16 मार्च), मैंदर्गी नगरपरिषद (17 मार्च), नागणहळ्ळी व मिरजगी (18 मार्च) या उपक्रमाद्वारे शेतकऱ्यांना थेट गावात जाऊन नुकसान भरपाई मिळणार असून, शासनाच्या महसूल जनसंवाद उपक्रमाला गती मिळणार आहे. तरी संबंधित ग्रामस्थांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्रमांक 11 डॉक्टर सीमा होळकर यांनी केले आहे.

# संशोधन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी सातत्याने काम - डॉ. हरीश तिवारी

## आंतरराष्ट्रीय परिषदेत ६५० संशोधक ऑनलाईन सहभागी

**पिंपरी (कटूसत्य वृत्त):-** संशोधन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी आणि गुणवत्तापूर्ण संशोधन प्रबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी पीसीसीओईआर चा संशोधन व विकास विभाग सातत्याने काम करत असल्याचे पीसीसीओईआरचे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले. त्या अंतर्गत "प्रभावी संशोधन लेखन, तत्वे आणि सराव'या विषयावर आंतरराष्ट्रीय शिक्षक विकास परिषदेचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत देश, विदेशातील तज्ज्वक्त्यांनी संशोधन लेखाची रचना, प्रभावी शीर्षक व सारांश लेखन, साहित्य सर्वेक्षणाची योग्य पद्धत, उच्च दर्जाच्या नियतकालिकांची निवड, संदर्भ व उद्धरण पद्धती तसेच साहित्यचौर्य टाळण्याच्या तंत्रांविषयी सखोल मार्गदर्शन केले. या परिषदेचा उद्देश प्राध्यापक, संशोधक आणि संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आंतरराष्ट्रीय दजार्चे संशोधन लेखन कौशल्य विकसित व्हावे असा आहे.

याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ६५० हून अधिक संशोधकांनी ऑनलाइन पद्धतीने संशोधन प्रबंध सादर केले, हे महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे असेही पीसीसीओईआरचे संचालक डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) मधील संशोधन व विकास विभागाच्या वतीने "प्रभावी संशोधन लेखन : तत्वे आणि सराव'या विषयावर आंतरराष्ट्रीय शिक्षक विकास परिषद आयोजित करण्यात आली होती.

या परिषदेत डॉ. पारिक्षित महाले (व्हीआयटी, पुणे) यांनी 'संशोधनाची ओळख' या विषयावर संशोधनाची मूलभूत तत्त्वे स्पष्ट केली. डॉ. मनीष शर्मा (डीवायपीसीओई, पुणे) यांनी 'पद्धतशीर साहित्य सर्वेक्षण' या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. डॉ. समीर गजघाटे (जीएचआरसीईएम, पुणे) यांनी 'संशोधन प्रस्तावाचे नियोजन व लेखन' या विषयावर महत्त्वपूर्ण पैलू मांडले. डॉ. सूर्य प्रकाश (इलाहाबाद) यांनी संशोधनाचा प्रभाव कसा वाढवायचा याविषयी मार्गदर्शन केले, तर डॉ. उमेश भाडाडे (एसएलआरटीसीई, मुंबई) यांनी 'संशोधन निष्कर्ष व परिणाम'या विषयावर परिणाम मांडणी व निष्कर्ष लेखनाची प्रभावी पद्धत समजून सांगितली.

डॉ. सुदर्शन बोबडे, डॉ. राहुल बावणे यांनी संयोजन केले. समन्वयक म्हणून डॉ. किशोर भांगले, डॉ. शिवांगा गव्हाणे यांनी काम पाहिले. उपसंचालक डॉ. राहुल मापारी व कुलसचिव प्रकाश येवले यांनी मार्गदर्शन केले.

पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि पीसीसीओईआरचे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी सहभागी प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

### जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

श्रीकांत सुदाम धोटे, रा.कातेवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **अर्जदार**
**विरूध्द**
ग्रामपंचायत पं.पिंपरी, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार प्रतिक्षा श्रीकांत धोटे जन्म दि.१३/८/२००७ काजल श्रीकांत घोटे जन्म दि.१२/८/२०११, निखील श्रीकांत घोटे अर्जात नमूद जन्म/मृत्यू दिनांक २७/१२/२०१३ रोजी कातेवाडी, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे प्रतिक्षा श्रीकांत धोटे, काजल श्रीकांत धोटे, काजल श्रीकांत धोटे यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे ऑगस्ट २००७, ऑगस्ट २०११, डिसेंबर २०१३ चे आभिलेखात अर्जदार याची मुले यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२४/३/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.९/३/२०२६

शिक्का हुकुमावरून **सही/-**
**तहसिलदार,मोहोळ.**

### जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

सचिन ज्ञानेश्वर गोटे, रा.मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **अर्जदार**
**विरूध्द**
मोहोळ नगरपरिषद, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची आजी कलावती रामचंद्र गोटे मृत्यू दि. ३०/१२/२०१२ व चुलते विलास रामचंद्र गोटे मृत्यू दि.१७/७/१९९६ रोजी मोहोळ ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे कलावती रामचंद्र गोटे, विलास रामचंद्र गोटे यांच्या केली मृत्यू बाबत सामनेवाला यांच्याकडे मृत्यू दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे डिसेंबर २०१२, जुलै १९९६ चे आभिलेखात अर्जदार यांचे चुलते व आजी मृत्यूनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात मृत्यूनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२/३/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे मृत्यू दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.१८/२/२०२६.

शिक्का हुकुमावरून **सही/-**
**तहसिलदार,मोहोळ.**

### जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

निहाल नूरमहमद शिकलगार, वय-३० वर्षे, धंदा-मजुरी, रा.सुलतान गादे, ता.सांगली. } **अर्जदार**
**विरूध्द**
मोहोळ नगरपरिषद, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची निहाल नूरमहमद शिकलगार जन्म दि.६/१२/१९९६ रोजी मौजे मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदाराने त्याबदल सदर या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील निहाल नूरमहमद शिकलगार यांच्या जन्माबाबतसामनेवाला यांच्या कडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमूद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्याच्या कडील माहे डिसेंबर १९९६ च्या अभिलेखात अर्जदार यांची जन्म नोद नसल्याचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या. में कोर्टात सामनेवाला यांच्यकडील आभिलेखात जन्माचीनोंद करून घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२५/३/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.९/३/२०२६.

शिक्का हुकुमावरून **सही/-**
**तहसिलदार,मोहोळ.**

### जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

रफिक इलाई शेख, वय-४८ वर्षे, धंदा-मजुरी, रा.मोहोळ, ता.मोहोळ } **अर्जदार**
**विरूध्द**
मोहोळ नगरपरिषद, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची रफिक इलाई शेख जन्म दि.१/६/१९७८ रोजी मौजे मोहोळ ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदारने त्याबदल सदर या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील रफिक इलाई शेख यांच्या जन्माबाबतसामनेवाला यांच्या कडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमूद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्याच्या कडील माहे जून १९७५ च्या अभिलेखात अर्जदार यांची जन्म नोद नसल्याचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या. में कोर्टात सामनेवाला यांच्यकडील आभिलेखात जन्माचीनोंद करून घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२५/३/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.९/३/२०२६.

शिक्का हुकुमावरून **सही/-**
**तहसिलदार,मोहोळ.**

### जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

हसन नबीलाल शेख, वय-७० वर्षे, धंदा-मजुरी, रा.पुणे } **अर्जदार**
**विरूध्द**
मोहोळ नगरपरिषद, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची हसन नबीलाल शेख जन्म दि.१/६/१९५५ रोजी मौजे मोहोळ ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदारने त्याबदल सदर या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील हसन नबीलाल शेख यांच्या जन्माबाबतसामनेवाला यांच्या कडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमूद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्याच्या कडील माहे जून १९७५ च्या अभिलेखात अर्जदार यांची जन्म नोद नसल्याचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या. में कोर्टात सामनेवाला यांच्यकडील आभिलेखात जन्माचीनोंद करून घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२५/३/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.९/३/२०२६.

शिक्का हुकुमावरून **सही/-**
**तहसिलदार,मोहोळ.**

### जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

अश्पाक महामुद शेख, वय-५१वर्षे, धंदा-मजुरी, रा. मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **अर्जदार**
**विरूध्द**
मोहोळ नगरपरिषद, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची अश्पाक महामुद शेख जन्म दि.१/६/१९७५ रोजी मौजे मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदारने त्याबदल सदर या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील अश्पाक महामुद शेख यांच्या जन्माबाबतसामनेवाला यांच्या कडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमूद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्याच्या कडील माहे जून १९७५ च्या अभिलेखात अर्जदार यांची जन्म नोद नसल्याचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या. में कोर्टात सामनेवाला यांच्यकडील आभिलेखात जन्माचीनोंद करून घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२५/३/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.९/३/२०२६.

शिक्का हुकुमावरून **सही/-**
**तहसिलदार,मोहोळ.**

### जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

शकीला शहाजान शेख, रा.तामलवाडी ता.तुळजापूर जि. सोलापूर } **अर्जदार**
**विरूध्द**
ग्रापंचायत पेनूर, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांचा शकीला शहाजान शेख यांचा जन्म दि. १/६/१९७८ रोजी पेनूर ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे शकीला शहाजान शेख यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९७८ चे आभिलेखात अर्जदार मान यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२५/३/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. ९/२/२०२६ हुकुमावरून

शिक्का **सही/-**
**तहसिलदार,मोहोळ.**

### जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

वैशाली धर्मा चंदनशिवे रा.शिरापूर ता.मोहोळ जि.सोलापूर } **अर्जदार**
**विरूध्द**
ग्रापंचायत लांबोटी, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांचा वैशाली धर्मा चंदनशिवे यांचा जन्म दि. १/६/१९८४ रोजी लांबोटी ता. मोहोळ.जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे वैशाली धर्मा चंदनशिवे यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९८४ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे.याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२५/३/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. ९/२/२०२६ हुकुमावरून

शिक्का **सही/-**
**तहसिलदार,मोहोळ.**

### जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

छाया बजरंग मोरे, रा.नरखेड, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **अर्जदार**
**विरूध्द**
ग्रापंचायत नरखेड, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांचा मुलगा दिपक बजरंग मोरे यांचा जन्म दि. १/६/१९८० रोजी नरखेड ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे दिपक बजरंग मोरे यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९८० चे आभिलेखात अर्जदार यांचा मुलाची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२५/३/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.९/२/२०२६. हुकुमावरून

शिक्का **सही/-**
**तहसिलदार,मोहोळ.**


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र


**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 196

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | | | 2 | | 4 |
| | | 7 | 5 | 8 | 6 | 9 | 1 | 3 |
| | 1 | | 3 | | | | | 7 |
| | 3 | | 6 | 5 | | 4 | 7 | 9 |
| | | 8 | 7 | | 3 | | 6 | 2 |
| | | | 2 | | | 5 | | 8 |
| 8 | 7 | | | | | | | |
| | 4 | 9 | | 1 | | | 2 | |
| 2 | 5 | | 4 | | | 8 | 9 | |

# फार्मा इंडस्ट्रीमध्ये 'क्वालिटी ॲश्युरन्स'चे महत्त्व समजावणारे अमोल कांबळे यांचे व्याख्यान

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी येथील श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ, निमगाव संचलित आर्या कॉलेज ऑफ फार्मसी येथे नेस्टॉर फार्मास्युटीकल्स, गोवा येथील कॉलिटी ॲश्युरन्स मॅनेजर अमोल कांबळे यांचे 'रोल ऑफ कॉलिटी ॲश्युरन्स इन फार्मा इंडस्ट्री' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न झाले. यावेळी अमोल कांबळे यांनी फार्मा उद्योगामध्ये क्वालिटी ॲश्युरन्स विभागाचे महत्त्व, त्याचे कामकाज तसेच औषधनिर्मिती



प्रक्रियेत गुणवत्ता नियंत्रण कसे राखले जाते याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. याशिवाय इंडस्ट्रीमधील प्रोडक्शन, क्वालिटी कंट्रोल, रिसर्च अँड डेव्हलपमेंट आणि पॅकेजिंग अशा विविध विभागांबाबतही त्यांनी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. डी. फार्मसी शिक्षण पूर्ण केल्यानंतर औषधनिर्मिती कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चव्हाण यांनी अमोल कांबळे यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. हर्षवर्धन वाघमारे यांनी कामकाज पाहिले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अजितदादांच्या विमान अपघातावर संशयाची छाया
## सीबीआय चौकशीची महादेव जानकर यांची मागणी

**इंदापूर (कटूसत्य वृत्त) :-** राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या बारामतीमधील विमान अपघातात झालेल्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेवरून विविध राजकीय नेत्यांकडून शंका उपस्थित केल्या जात असून या प्रकरणाची सखोल आणि स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. दरम्यान, राष्ट्रवादी समाज पक्षाचे नेते आणि माजी दुग्धविकास मंत्री यांनी या प्रकरणात थेट सीबीआय चौकशीची मागणी करत राज्य सरकारच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.



पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे माध्यमांशी संवाद साधताना महादेव जानकर यांनी म्हटले की, 'अजितदादांसारख्या मोठ्या लोकनेत्याचा अशा पद्धतीने मृत्यू झाला, तर जनतेच्या मनात प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. सध्या जो सरकारी अहवाल समोर येत आहे, त्यावर राज्यातील ९९ टक्के जनता विश्वास ठेवायला तयार नाही.' जानकर पुढे म्हणाले की, या घटनेचा तपास केवळ पोलीस यंत्रणांवर सोडून न देता केंद्र सरकारने हस्तक्षेप करून या प्रकरणाची सखोल चौकशी करावी. 'या प्रकरणाचे 'दूध का दूध आणि पाणी का पाणी;करण्यासाठी केंद्रीय तपास यंत्रणेकडून चौकशी होणे गरजेचे आहे,' असे ते म्हणाले.

त्यांच्या मते, या घटनेमागे कोणतेही मोठे राजकीय कारस्थान दडलेले आहे का, हे देखील तपासातून समोर आले पाहिजे. 'जर सरकारला आपली प्रतिमा स्वच्छ ठेवायची असेल, तर त्यांनी उच्चस्तरीय चौकशीला घाबरण्याचे कारण नाही,' असा इशाराही त्यांनी दिला. महादेव जानकर यांनी या प्रकरणात केवळ सीबीआय चौकशीची मागणीच केली नाही, तर तपासाची निष्पक्षता सुनिश्चित करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी केली आहे. 'अजितदादांच्या मृत्यूचे सत्य जनतेसमोर आलेच पाहिजे. यासाठी पारदर्शक आणि निष्पक्ष तपास होणे अत्यंत आवश्यक आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.

;दरम्यान, दिवंगत अजित पवार यांचे पुतणे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे आमदार यांनीही या प्रकरणावर सातत्याने प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी अनेक पत्रकार परिषदांमधून या अपघाताबाबत शंका व्यक्त करत सखोल चौकशीची मागणी केली आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर या प्रकरणावरून राज्यातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एका बाजूला अपघाताबाबत अधिकृत तपास सुरू असताना दुसऱ्या बाजूला विविध राजकीय नेते स्वतंत्र आणि उच्चस्तरीय चौकशीची मागणी करत आहेत.

दरम्यान, या सर्व आरोपांवर राज्य सरकारकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. मात्र या प्रकरणाची चौकशी आणि त्यातून समोर येणाऱ्या निष्कर्षांकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# अर्थसंकल्पात कांद्याला दिलासा नाही; शेतकऱ्यांत नाराजी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात गेल्या काही वर्षांत कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले असले, तरी यंदा बाजारात मिळालेल्या अत्यल्प दरामुळे कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. उत्पादन खर्च तर दूरच, पण बारदाना, वाहतूक आणि हमालीचा खर्चही निघाला नसल्याने अनेक शेतकऱ्यांना तोटा सहन करत कांदा विकावा लागला आहे. अशा परिस्थितीत राज्याच्या अर्थसंकल्पातून कांदा उत्पादकांना भरीव मदत जाहीर होईल, अशी अपेक्षा होती; मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

कांद्याच्या घसरलेल्या दरामुळे जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. बाजारात कांद्याचे दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी राहिल्याने अनेकांना खर्चही निघणार नाही, अशा परिस्थितीत माल विकावा लागला. त्यामुळे सरकारने प्रतिक्विंटल किमान ५०० रुपयांचे अनुदान जाहीर करावे, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून करण्यात आली होती. यासाठी विविध संघटनांनी



आंदोलने करून सरकारचे लक्ष वेधण्याचाही प्रयत्न केला होता. मात्र अर्थसंकल्पात या मागणीचा उल्लेखही न झाल्याने शेतकरी संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

रयत क्रांती शेतकरी संघटनेचे नामदेव पवार म्हणाले, 'कांद्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले असताना सरकारला त्याचे सोयरसूतकही नाही. पडरमोड करून कांदा विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. कांदा विक्रीला प्रतिक्विंटल एक हजार रुपये अनुदानाची मागणी केली होती. किमान ५०० रुपये तरी जाहीर होतील, अशी अपेक्षा होती; मात्र ती फोल ठरली. सरकारने शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरले असून याची किंमत सरकारला मोजावी लागेल.'

कांदा उत्पादक शेतकरी दिनेश शिंदे यांनीही अर्थसंकल्पावर टीका करताना सांगितले की, 'या वर्षीचा अर्थसंकल्प शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरणारा ठरला आहे. शेतीमालाला हमीभाव, सरसकट कर्जमाफी तसेच खत, बियाणे व औषधांच्या वाढत्या खर्चावर नियंत्रण यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिलेले दिसत नाही. कांदा उत्पादक मोठ्या संकटातून जात असताना अर्थसंकल्पात अनुदानाची घोषणा होईल, अशी अपेक्षा होती; मात्र त्याबाबत कोणतीही ठोस घोषणा करण्यात आलेली नाही.'

शेतकरी संघटनांच्या मते, सरकारने कर्जमाफीची घोषणा केली असली तरी कांदा उत्पादकांसाठी स्वतंत्र योजना जाहीर केलेली नाही. त्यामुळे संकटात सापडलेल्या कांदा उत्पादकांना सरकारने वाऱ्यावर सोडल्याचा आरोप केला जात आहे. सरकार मायबाप असल्याचे म्हटले जाते; मात्र कांदा उत्पादकांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून सरकारने शेतकऱ्यांच्या डोळ्यात धूळफेक केल्याची टीका होत आहे.

तज्ज्ञांच्या मते, शेतकऱ्यांना केवळ कर्जमाफीपेक्षा शेतीमालाला हमीभाव मिळणे अधिक महत्त्वाचे आहे. कांद्याच्या दरातील सततच्या चढ-उतारामुळे शेतकरी वारंवार आर्थिक संकटात सापडतात. त्यामुळे कांद्याला हमीभावाची ठोस व्यवस्था करण्याची मागणी पुन्हा एकदा पुढे येत आहे.

दरम्यान, राज्य सरकारने अर्थसंकल्पात 'पुण्यलोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना' जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेऊन नियमित परतफेड करणाऱ्या सुमारे ८५ हजार ४२३ शेतकऱ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे. त्यासाठी सोलापूर जिल्ह्याला सुमारे ४२७ कोटी ६५ लाख रुपयांचा निधी मिळणार आहे. तसेच दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी लागू झाल्यास जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

तथापि, कांदा उत्पादकांच्या तातडीच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना न झाल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून सरकारने तातडीने हस्तक्षेप करून कांदा उत्पादकांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# मन निरोगी ठेवण्यासाठी छंद आणि योग महत्त्वाचे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आयुष्य आनंदाने जगण्यासाठी शारीरिक व मानसिक स्वास्थ्य निरोगी असणे अत्यावश्यक आहे. जीवनातील ताणतणाव कमी करण्यासाठी छंद जोपासणे, आवडीच्या गोष्टींसाठी वेळ काढणे, प्राणायाम, योगासने आणि ध्यानधारणा करणे, माफ करण्याची वृत्ती अंगी बाळगणे तसेच मोबाइल आणि स्क्रीन टाईम मर्यादित ठेवणे उपयुक्त ठरते, असे मत मानसोपचार तज्ज्ञ डॉ. नितीन भोगे यांनी व्यक्त केले. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मनोरमा परिवारातर्फे आयोजित ताणतणाव व्यवस्थापन या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनोरमा परिवाराचे मार्गदर्शक श्रीकांत मोरे होते.

प्रास्ताविक शोभा मोरे यांनी केले. यावेळी डॉ. भोगे म्हणाले की, जेव्हा व्यक्तीचे विचार सुसंगत असतात आणि भावना व वर्तणूक यांचा ताळमेळ साधला जातो, तेव्हा मन तणावमुक्त राहते. योग्य नियोजनामुळे कामाचा ताण कमी होतो. तसेच कार्यालयीन कामकाजात स्वच्छता, नीटनेटकेपणा, वेळेचे नियोजन आणि सुसंवाद या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात.

अध्यक्षीय भाषणात श्रीकांत मोरे म्हणाले, 'मन चंगा तो कटोती में गंगा' या उक्तीप्रमाणे मन संयमी ठेवणे, एकाग्रता साधणे आणि अनावश्यक विचार टाळणे आवश्यक आहे.

या कार्यक्रमास मनोरमा बँकेच्या कार्याध्यक्ष अस्मिता गायकवाड, शिल्पा मोहिते, कविता कुलकर्णी, प्रकाश भोईटे तसेच अनेक ग्राहक बंधू-भगिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या भोसले यांनी केले, तर आभार डॉ. सुमित मोरे यांनी मानले.

# लखन भाऊ कोळी युवा मंचच्या वतीने विविध क्षेत्रातील महिलांचा गौरव



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर लखन भाऊ कोळी युवा मंच यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या सन्मान सोहळ्यात मोहोळ नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सिद्धी वस्त्रे, क्षमा बारसकर, मालती नांगरे, कल्याणी महामुनी, सुलोचना पाटील, ज्योती अष्टूळ, प्रिती घाडगे, डॉ. प्रियंका पाटकर, अनिता बळवंतराव, प्रिती सुतार, हेमलता सोनवणे, डॉ. निलम कोळी, डॉ. अश्विनी माने, उज्वला ओहोळ, पंचशिला कसबेकर, तनूजा बारसकर, कमरुनिस्सा कुरुलकर, वैष्णवी आदलिंगे, सुवर्णा सावंतराव, कार्तिकी गरगडे, स्मृती विरपे, विद्या केवळे, शोभा गोरवे आदींसह अनेक मान्यवर महिलांचा सन्मान करण्यात आला.


यावेळी मोहोळ नगरपरिषदेच्या नगरसेविका राणी गोडसे, नगरसेविका सरताज सय्यद, नगर सेविका सपना अष्टूळ, नगरसेविका साखराबाई बरकडे, नगरसेविका स्वप्नाली जाधव या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

लखन भाऊ कोळी युवा मंचच्या माध्यमातून सौ. अनिता कोळी, सौ उज्वला कोळी व सौ. योगिता कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित मान्यवर महिलांचा सन्मान करून त्यांच्या कायार्चा गौरव केला. यावेळी सुजाता कोळी, माया कदम, ज्योती कोळी, राणी कोळी सुश्मिता कोळी जयश्री चंदिले आशाताई माने अंजना गावडे सोनाली कांबळे एकता कांबळे मनीषा सरवदे पायल चव्हाण दिपाली कोळी रूपाली कोळी सृष्टी कोळी शिवगंगा कोळी पूजा कोळी महादेवी स्वामी सुवर्णा पवार मोहिनी कोळी मंदाताई राऊत शोभा गोरवे कविता सरक पूजा चव्हाण वैष्णवी आदलिंगे आदि. महिला उपस्थित होते.

या कार्यक्रमास नगरसेवक लखन कोळी, सागर कोळी तसेच मंचचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांच्या कायार्चा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# स्त्री कणखर व कठोर बनल्याशिवाय समाजात सामाजिक समता प्रस्थापित होणार नाही- म्हमाणे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आधुनिक काळात स्त्रियावरील अन्याय कमी होत आहेत. स्त्रियाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलत आहे. त्यामुळे स्त्रियांनी समाजात, कुटुंबात वावरताना जिथे अन्याय होईल. त्या ठिकाणी अन्याय सहन न करता न्याय मिळेपर्यंत संघर्ष करत राहावे. स्त्री कणखर व कठोर बनल्याशिवाय भारतीय समाजात सामाजिक समता प्रस्थापित होणार नाही. असे प्रतिपादन एस.व्ही. सी.एस. हायस्कूल व ज्युनि. कॉलेजचे प्राचार्य संगप्पा म्हमाणे यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त प्रशालेत आयोजित



केलेल्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य म्हमाणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक केदार पटणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वेदांत हुमनाबादे, यशश्री चौरे व साक्षी अळगुंडगी यांनी आपल्या भाषणातून इतिहासातील विविध प्रेरणादायी महिला विषयी माहिती सांगून महिलांच्या शिक्षणाचे, स्वावलंबनाचे महत्त्व स्पष्ट केले. इयत्ता आठवी व नववी मधील विद्यार्थिनींनी 'स्त्री शक्तीचा जागर' या गीतावर सुंदर नृत्य सादर करून स्त्रीच्या विविध रूपातील शक्तीचे दर्शन घडविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भक्ती अळगुंडगी व अनन्या आगबतीन यांनी केले तर समर्थ कोरे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षक- शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

५०० जणांना फेटा- जागतिक महिला दिनानिमित्त महिला पालक दीपा स्वामी, अर्चना लंगोटे, प्रशाला व ज्युनिअर कॉलेज मधील सर्व प्राध्यापिका, शिक्षिका व विद्यार्थिनींना ५०० फेटा बांधून व भेटवस्तू देऊन प्राचार्य संगप्पा म्हमाणे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. प्रशालेच्या या उपक्रमाचे महिला पालकांनी कौतुक केले.

# अकलूज पोलीस स्टेशनच्या वतीने महिलादिन साजरा



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज पोलीस स्टेशनच्या वतीने अकलूज व परिसरातील विविध क्षेत्रातील धडाडीने कार्यरत असलेल्या महिलांचा सत्कार, अकलूज पोलीस स्टेशनच्या पोलीस उपनिरीक्षक करिश्मा वणवे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

यामध्ये पोलीस पाटील,महिला होमगार्ड, महिला दक्षता समिती,डॉक्टर, वकील,शिक्षण क्षेत्र, समाजसेविका, पोलीस ठाणे क्षेत्राततील महिला पोलीस यांना सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमात अकलूज नगरपरिषदेचे पहिल्या महिला नगराध्यक्ष सौ.रेश्माताई आडगळे, महिला नगरसेविका मनिषा तिकोटे, नम्रता जगताप, मृदुला सुर्यवंशी, मंदाकिनी पाटोळे, रेश्मा तांबोळी, वैशाली भोसले, उज्वला विटकर, स्वाती फुले, दिपाली वाघमोडे, जयश्री एकतपुरे, प्रियंका गायकवाड, पोलीस पाटील तेजस्वी दळवी (संगम), सुभद्रा चंदनशिवे (जांभुड),मनिषा पाटील (बोरगाव), वैद्यकीय क्षेत्रात डॉ.मानसी देवडीकर, सामाजसेविका छाया बुराडे, फातिमा पाटावाला, डॉ. मिनाक्षी जगदाळे, शिक्षण क्षेत्रात कल्पना मोरे, हसरून मुलाणी, आरती तोरणे, हसिना शेख महिला उद्योजक, हेड कॉन्स्टेबल अनुराधा अडगळे, हेड कॉन्स्टेबल मंदाकिनी चव्हाण यांचा फेटा बांधून, पुष्पगुच्छ व फुलांचे झाड देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

या यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांनी आपल्या अनुभव सांगत महिलांना भेडसावणाऱ्या अडीअडचणी, समस्या आणि त्यावरील उपाययोजना याबाबत मार्गदर्शनपर विचार मांडले. तसेच महिला सुरक्षेबाबत आणि सक्षमीकरणाबाबतही चर्चा करण्यात आली.यावेळी पोलीस ठाण्याकडील महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषी यांत्रिकीकरण संदर्भात महाडीबीटी पोर्टलवरील पूर्वसंमती प्रक्रिया चालू करा- आ. मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ वेळेत मिळावा यासाठी महाडीबीटी पोर्टलवरील पूर्वसंमती प्रक्रियेतील अडचणींचा मुद्दा आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी महाराष्ट्र राज्य विधिमंडळात उपस्थित केला.महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून फळबाग लागवड, सूक्ष्म सिंचन,कृषी यांत्रिकीकरण आदी योजनांसाठी राज्यातील लाखो शेतकऱ्यांनी अर्ज केले आहेत.मात्र काही महिन्यांपासून पूर्वसंमती प्रक्रिया बंद असल्याने अनेक शेतकऱ्यांना साहित्य खरेदी व कामे सुरू करण्यात अडचणी येत असल्याकडे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले.



यासोबतच कृषी योजनांच्या मोका तपासणीदरम्यान जिओ-टॅगिंगसाठी प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र लॉगिन वापरावे लागत असल्यामुळे तपासणी व अनुदान वितरण प्रक्रियेत विलंब होत असल्याने सर्व कृषी योजनांचे जिओ-टॅगिंग व मोका तपासणी एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर करण्याची व्यवस्था शासनाने करावी,अशी मागणी त्यांनी केली.तसेच अनेक योजनांमध्ये लाभार्थी निवड झाल्यानंतर पूर्वसंमती मिळाल्यानंतरच बिले अपलोड करण्याची अट असल्यामुळे अनेक पात्र शेतकरी अनुदानापासून वंचित राहत असल्याच्या तक्रारी येत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.त्यामुळे पूर्वसंमतीची अट शिथिल करण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा,अशी मागणी केली.

यावर उत्तर देताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की,सन २०२५-२६ मध्ये कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी महाडीबीटी पोर्टलवरून ४९, ६६,५८३ अर्ज निवडण्यात आले आहेत.

त्यापैकी १८, ०४, ३१७ अर्ज प्रक्रिया टप्प्यात असून आतापर्यंत ७,५७,१३५ अर्जांना पूर्वसंमती देण्यात आली आहे. सध्या उपलब्ध निधीनुसार पुढील पूर्वसंमती देण्यात येणार असून कोणताही अर्ज रद्द होणार नाही, निवड झालेल्या प्रत्येक शेतकऱ्यांना लाभ देण्यात येणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले.

यावेळी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी निवड झालेल्या शेतकऱ्यांना योजनांचा लाभ मिळावा यासाठी शासनाने जास्तीत जास्त निधीची तरतूद करून प्रलंबित अर्जांना तातडीने पूर्वसंमती द्यावी,अशी मागणी केली. तसेच कृषी योजनांची अंमलबजावणी सुलभ,पारदर्शक व शेतकरी हिताची व्हावी यासाठी आवश्यक तांत्रिक सुधारणा करण्याचीही त्यांनी सरकारकडे मागणी केली.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अनगर येथे महिला दिन उत्साहात साजरा



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** महिला दिनानिमित्त शासनाकडून महिला सक्षमीकरण सप्ताह साजरा करण्यात येत आहे. जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा अनगर येथे देखील यानिमित्ताने महिलांसाठी विविध कार्यक्रमाचे आणि विविध स्पर्धाचे आयोजन करून महिला दिन साजरा करण्यात आला. महिला मेळावा घेऊन महिलाशी संवाद साधण्यात आला. या कार्यक्रमासाठी अनगर हायस्कूलच्या निवृत्त शिक्षिका श्रीम. शशिकला काळे मॅडम अध्यक्ष म्हणून लाभल्या. निवृत्त शिक्षिका घाटुळे मॅडम, अनगरची कन्या व कुरणवाडी ची स्नुषा असलेली या शाळेची माजी विद्यार्थिनी पोलीस खात्यात कार्यरत सुरेखा थिटे या प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमास उपस्थित होत्या. विविध स्पर्धेतील सहभागी महिलांना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाचे बक्षीस वितरण करण्यात आले. विविध स्पर्धेतील महिलांना बक्षीसासाठी शाळेचे पालक म्हणून, रमेश चंद्रकांत गुंड यांनी सहकार्य केले सर्व महिलांना त्यांच्याकडून बक्षीस देण्यात आले शाळेच्या वतीने त्यांचे खूप खूप आभार. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमत सरस्वती वायचळ मॅडम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कीर्ती क्षीरसागर मॅडम, सीमा गुंड मॅडम, पल्लवी राजमाने मॅडम, सत्यभामा भडकवाड मॅडम आदी शिक्षिका भगिनींनी घेतले. सूत्रसंचालन सीमा गुंड यांनी केले. तर आभार सत्यभामा भडकवाड मॅडम यांनी मानले.

# एन.बी.नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर येथे बारावा माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न झाला.



या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ . आर टी व्यवहारे, कार्यक्रम समन्वयक प्रा. एस पी सगट यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनीही माजी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देत अनुभव कथन केले. राकेश गायकवाड, श्रीरंग औरंगाबादकर, ऋतूजा गायकवाड, अजय वेळेकर, योगेश नायकवाडी आणि निखिल शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात विविध मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. छोट्या-मोठ्या फन उपक्रमांमध्ये माजी विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले आणि कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित झाला. उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी साकेत कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. मानसी जाधव यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.